THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 27TH AUGUST 1896.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १२ माहे आगस्ट, सन १८९६.

नंबर ६३४१.—हिंदुस्थान सरकारचे खालीं दिलेले जाहिरनामे पुनः प्रसिद्ध केले आहेतः—

" सेपरेट रेव्हिन्यू.

**स्टांप.**

जुडिशियल, वगैरे.

किरकोळ.

मुक्काम सिमला, तारीख ४ माहे आगस्ट, सन १८९६.

नंबर ३३१८-एस् आर.—कोर्टाचे फीचा आक्ट ( सन १८७० चा ७ वा ) याच्या २६ व्या कलमावरून दिलेला अधिकार चालवून, आणि हिंदुस्थान सरकारचे फिनान्स ऑण्ड कामर्स डिपार्टमेंटांतील जाहिरनामे, नंबर ३६१, तारीख १८ माहे एप्रिल, सन १८८३, व नंबर ४०७०-एस्. आर,* तारीख २ माहे आगस्ट, सन १८९१, यांस अनुलक्षून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे असें फर्मावितात कीं सदहू आक्टाच्या ३ ऱ्या कलमाच्या पहिल्या पारिग्राफांत सांगितलेल्या फी, ज्यांच्यावर मध्यभागीं एका वर्तुलांत राणीचा मुखवटा असून त्याच्या प्रत्येक बाजूस किंमत छापलेली असेल, व वरच्या बाजूस 'High Court Service' हे शब्द छापलेले असतील अशा चिकटणाऱ्या स्टांपांनीं दर्शविण्याचा अधिकार आहे.

* अनुक्रमें तारीख १७ मे सन १८८३ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, याच्या ३५२ व्या पृष्ठावर, व तारीख २९ आगस्ट सन १८९५ चें मुंबई सरकारी ग्याझेट, भाग १ ला, याच्या ९१० व्या पृष्ठावर पुन: प्रसिद्ध केलेले.

---

सेपरेट रेव्हिन्यू.

**स्टांप.**

जुडिशियल स्टांप.

मुक्काम सिमला, तारीख ६ माहे आगस्ट, सन १८९६.

नंबर ३३८९-एस्. आर.—यावरून असें जाहिर करण्यांत येतें कीं कोर्टाचे फीचा आक्ट ( सन १८७० चा ७ वा ) याच्या ३९ व्या कलमावरून दिलेला अधिकार चालवून गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल यांनीं असें फर्मावितें

आहे कीं जो दंड किंवा दंडाचा जो कोणताहि भाग परत देण्याविषयीं लायक अधिकाऱ्यानें हुकुम केला असेल तो दंड किंवा दंडाचा तो भाग परत मिळण्याबद्दलच्या अर्जावर कोणतीहि कोर्ट फी घेऊं नये.

( सही ) जे. एफ्. फिन्ले,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार. "

आलीजा धि रैट आनरेबल धि गव्हर्नर इन् कौन्सिल यांच्या हुकुमावरून,

( सही ) जे. डब्ल्यू. म्यूर-माकेन्झी,
आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

---

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.